08.01.2018

प्रति
**मा. कुलगुरु,**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर

महोदय,

शारीरिक शिक्षण व क्रीड़ा क्षेत्र विकासासंबंधीत अनेक मागण्या प्रलंबित आहेत. या बाबत वेळोवेळी निवेदन दिलेले आहेत. खालील मागण्या खेळाडूंच्या हिताच्या व खेळाडूंना केंद्रबिंदु मानून विद्यापीठाचे नावलौकिक होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहेत.

1. **क्रीडा आंतर गृहाची निर्मीती** : युथ अफेअर ॲन्ड स्पोर्ट विभागाकडू मंजूर झालेल्या आंतर गृहाची निर्मीती विद्यापीठाच्या क्रीडा परीसरात व्हायला पाहीजे. कारण विद्यापीठाचे सर्व क्रीडांगणे या परीसरात आहेत. देशातील सर्व विद्यापीठांमध्ये क्रीडा परीसर एकाच ठिकाणी राहते. क्रीडा वातावरण निर्मिती, स्पर्धा आयोजन, अधिकतर खेळाडूंना याचा लाभ मिळण्यासाठी, याची देखरेख करण्यासाठी हे क्रीडा आंतरगृह आपल्या क्रीडा परीसरात पुर्व नियोजित जागेवरच बांधण्यात यावे. याचे बांधकाम वेळेवर सुरु व्हावे आणि तांत्रिक दृष्टया योग्य असण्याकरिता आपल्या अध्यक्षतेखाली क्रीडा क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्यात यावी.
2. **सिंथेटीक टॅक तयार करण्याबाबत** : 2 वर्षापुर्वीपासून सिंथेटीक ट्रॅक निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. परंतू याचे काम चालू झालेले नाही, हे कार्य लवकरात लवकर चालू करुन विद्यापीठात आज जी उनिव भासते ती दुर करावी.
3. **प्रसाधन गृह, चेंजीग रुम व स्टोअर निर्मिती** : वेगवेगळया क्रीडांगणाला लागून मुले–मुलींसाठी स्वतंत्र कायमस्वरुपी प्रसाधन गृह आणि चेंजींग रुम आवश्यक आहेत, साबतच त्याचा रखरखाव नियमित व्हायला पाहीजे. तसेच विद्यापीठाचे महागडे क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी चागले स्टोअर असावे.
4. **क्रीडा गुण सवलत पास होण्याकरिता (Incentive Marks) :** आंतर–विद्यापीठ व आंतर–महाविद्यालयीन स्पर्धेत प्राविण्यप्राप्त खेळाडूंना **Ordinance No. 1 of 2010** प्रमाणे 25 क्रीडा गुण मिळतात, परंतू या गुणांचा पास होण्यासाठी फायदा होत नाही. त्यामुळे चांगले खेळाडू 4–5 गुणांनी नापास होतात आणि शिक्षणापासून वंचिंत राहतात. जेव्हाकी खेळाडू वर्षभर दररोज सकाळ–संध्याकाळ सराव करतात तर स्पर्धेदरम्यान दिवसभर वेळ देतात, यांची मेहनत पाहता इतर विद्यापीठ व बोर्डाप्रमाणे क्रीडा गुणांचा पास होण्याकरिता फायदा व्हावा, यासाठी **Ordinance No. 1 of 2010** मध्ये सुधारणा करावी, म्हणजे देण्यात येणाऱ्या गुणांचा खरा लाभ खेळाडूंना मिळेल.

5. **<u>क्रीडा शिष्यवृत्ती धोरण</u>** : आंतर विद्यापीठ स्पर्धेत स्थान प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना वार्षिक क्रीडा शिष्यवृत्ती चालू करण्यात आली आहे. परंतू याचे स्वरुप किंवा धोरण निश्चित नाही. याकरिता माजी मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल सुध्दा सादर केलेला आहे. या क्रीडा शिष्यवृत्तीचे स्वरुप व धोरण पुढील प्रमाणे निश्चित करुन जाहीर करावे.

अ. सांघीक खेळामध्ये विभागीय आंतर–विद्यापीठ स्पर्धेतून अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ स्पर्धेकरीता पात्र (Qualify) होणाऱ्या संघातील प्रत्येक खेळाडूला रोख रुपये 5000/– शिष्यवृत्ती देण्याचे प्रावधान असावे.

ब. सांघीक खेळामध्ये अखिल भारतीय आंतर–विद्यापीठ स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केल्यास प्रति खेळाडू रु. 10,000/–, 7000/– व 5000/– शिष्यवृत्ती देण्याचे प्रावधान असावे.

क. वैयक्तीक खेळ : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पहिल्या 5 मध्ये स्थान प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना रु. 25000/–, 20,000/–, 15000/– 10000/– व 5000/– प्रथम, द्वितीय, तृतीय, चतूर्थ व पंचम क्रमशः शिष्यवृत्ती देण्याचे प्रावधान असावे.

ड. या सर्व शिष्यवृत्ती प्राप्त खेळाडूंचा सत्कार दरवर्षी शारीरिक शिक्षण विभागाकडून 29 ऑगष्ट राष्टीय क्रीडा दिवसाला विशेष कार्यक्रम आयोजित करुण करण्यात यावा.

इ. या संघा सोबत जाणारे सर्व प्रशिक्षक व व्यवस्थापक यांचा सत्कार करण्यात यावा.

6. **<u>प्रशिक्षण शिबिर</u>** : गेल्या काही वर्षात आंतर–विद्यापीठ स्पर्धेपुर्वी अधिकत्तर खेळांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आलेले नाहीत, ज्याखेळांचे आयोजित होत अआहेत ते 3.–4 दिवसांचे असतात. आंतर–विद्यापीठ स्पर्धेपुर्वी कमीत–कमी 15 दिवसाचे 12 ऐवजी 24 व 16 ऐवजी 32 खेळाडुंचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करूण नंतर अंतिम निवड करावी, त्यामुळे आंतर–विद्यापीठ स्पर्धेत खेळाडू चांगला परफार्मन्स देतील. निवड समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण शिबिर घेणे व आंतर– विद्यापीठ स्पर्धेकरिता संघासोबत जाणे अनिवार्य करावे. हा निर्णय मंडळाने घेतला आहे, पंरतू याची अंमलबजावणी व्हावी हीच विनंती. तसेच या काळात **खेळाडूंना पूर्ण दिवसाचा दैनिक भत्ता दररोज** देण्यात यावा.

7. **<u>ब्लेझर, कीट, ट्रँकसुट व प्रमाणपत्र</u>** : गेल्या तिन वर्षात आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या खेळाडूंना ब्लेझर मिळाले नाहीत. ब्लेझर हे स्पर्धेला जातांनाच दयायला पाहीजे. परंतू दरवर्षी वित्त विभागाची तांत्रीक अडचन पुढे करुन ब्लेझर देण्यात येत नाहीत. शारीरिक शिक्षण विभागाकरिता वित्तीय तांत्रीक अडचणी मधे न आणता, वेळोवेळी लागणारे साहित्य, कीट, ट्रँकसुट, ब्लेझर, दैनिक भत्ता वेळेवर देण्यात यावे. तसेच खेळाडूंना आंतर–विद्यापीठ स्पर्धेचे प्रमाणपत्र सुध्दा खेळून परत आल्यानंतर लगेच द्यावेत.

8. **<u>टांतर–विद्यापीठ स्पर्धेकरिता तत्काळ आरक्षण</u>** : विद्यापीठाचे अनेक संघ वेळेवर बिना–आरक्षण आंतर–विद्यापीठ स्पर्धेसाठी जातात. तसेच येतांना तारीख निश्चित नसते, अशा वेळी संघ बिना आरक्षण प्रवास करतात. खेळाडूना नेहमीच आरक्षण मिळणे गरजेचे आहे. याकरिता वेळ प्रसंगी तत्काळ आरक्षण करण्याचे प्रावधान असावे.

9. **दैनिक भत्ता व रिफ्रेशमेंट** : आता देण्यात येणारा दैनिक भत्ता व रिफ्रेशमेंट वाढती महागाई व ईतर विद्यापीठांच्या तुलनेत फारच कमी आहे. यामंळे आज देण्यात येत असलेला दैनिक भत्ता व रिफ्रेशमेंट डबल करण्यात यावा.

10. **खेळाडूंचा गौरव** : आंतर महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये स्थान प्राप्त खेळाडूंचा सत्कार मैदानावर स्पर्धा संपल्यानंतरच करण्यात यावा. याकरिता सात वर्षापूर्वी रु 25000/– चे प्रावधान सुध्दा करण्यात आले होते. परंतू ॲथलेटीक्स सोडून इतर कुठल्याही स्पर्धेत खेळाडूंचा गौरव करण्यात येत नाही. तरी आपणास विनंती आहे की सर्वच वैयक्तीक व सांघीक स्पर्धा संपल्यानंतर लगेच खेळाडूंचा गौरव प्रमाणपत्र व पदक देवून करण्यात यावा.

11. **पंच मानधन** : आज देण्यात येत असलेले पंच मानधन फारच कमी असल्यामुळे मानधनात सुधारणा करण्यात यावी. सर्व स्पर्धा प्रभारी, प्रशिक्षण शिबिर प्रशिक्षक, निवड चाचणी सदस्य, ॲथलेटीक्स पंच आणि क्रासकंट्री पायलट व पंच यांना रु 250/– प्रती सत्र व इतर अधिव्याख्यात्यांप्रमाणे वाहन भत्ता रु 100/– देण्यात यावा.

12. **आंतर–महाविद्यालयीन स्पर्धेकरिता अग्रीम रक्कम देण्याबाबत** : विद्यापीठाव्दारे आयोजित आंतर–महाविद्यालयीन स्पर्धेचा खर्च करण्याकरिता संबंधीत महाविद्यालयात खर्चाचा अंदाज काढून इतर विद्यापीठांप्रमाणे 75 टक्के रक्कम अग्रीम देण्याचे प्रावधान करण्यात यावे. तसेच स्पर्धा संपल्यानंतर एक–एक वर्ष पर्यंत देयक थकीत राहतात, ते हिशोब सादर केल्यानंतर लगेच देण्याची तरतुद करण्यात यावी. ज्यामुळे स्पर्धा आयोजन सोयीचे होईल. आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाला पंच मानधना व्यतिरिक्त **किरकोळ खर्च** म्हणून प्रती मॅच रु. 250/– देण्याचे प्रावधान करावे.

वरील काही बाबींवर यापूर्वी अनेक वेळा चर्चा झोलेली आहे, काही मागण्या यापूर्वी मंजूर पण केल्यात, परंतू आजवर वरील मागण्याबाबत ठोस निर्णय घेण्यात आलेले नाहीत. तसेच मुद्दा क्र. 1 आणि 2 फार महत्वाचे असल्यामुळे याबाबत तातडीने निर्णय घ्यावा. वरील पैकी आर्थिक बाबींसबंधी विचार करता विभागाची आर्थिकबाजू सुध्दा फारच मजबूत आहे, वरील बाबींची अंमलबजावणी करण्यास गती द्यावी व संबंधीतांना तसे आदेश द्यावेत. यामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल व विद्यापीठाचे क्रीडाक्षेत्रात आणि राष्ट्रीय–स्तरावर नाव लौकीक होऊन राष्ट्रनिर्मीती होण्यास हातभार लागेल.

धन्यवाद !

आपला नम्र

अध्यक्ष/सचिव
रा.तु.म.ना.वि.शा.शि.शिक्षक संघटना